# श्री अगस्त्यऋषी अभंगावली

अनिल सहस्रबुद्धे

श्री अगस्त्यऋषींची पालखी पायी दिंडी सोहळ्यासह प्रतिवर्षी आषाढी वारीला अकोल्याहून पंढरपूरला नेण्याचा उपक्रम सुरू झाला आहे. अगस्त्य भक्तांच्या दिंडीत, भजनी मंडळांमध्ये, अगस्त्य विभूतिमत्त्व अभंगांच्या स्वरूपात गायिले जावे म्हणून ही अभंगावली अगस्त्य चरणी सादर...

आनंदोत्सव
प्रकाशन मंच

प्रकाशक
चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत

**श्री अगस्त्यऋषी अभंगावली (अभंग कविता)**
**Shri Agastyarishi Abhangawali**
कवी- अनिल सहस्रबुद्धे ९८८१५००९४२

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे

**प्रकाशक**
आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड
अहमदनगर, महाराष्ट्र, भारत. ४१४००३
फोन : (०२४१) २४२४१६७

प्रथम आवृत्ती महाशिवरात्री २०१८

**टाईपसेटींग-लेआऊट**
कुलकर्णी टाईपसेटर्स, श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर ९८५०२३२८९०

**मुद्रक**
मळगंगा ऑफसेट, अहमदनगर

मूल्य :- १०१/-
विशेष निवेदन : 'आनंदोत्सव' प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.
सदर पुस्तकाचा संपूर्ण निर्मिती खर्च अगस्त्यभक्त सौ. अलका गजानन पवार व सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे यांनी केला असून सदर पुस्तक अगस्त्यचरणी अर्पण केले असून; श्री अगस्त्य ऋषी देवस्थान ट्रस्ट, अकोले, अहमदनगर यांच्याकडे प्रती सप्रेम भेट दिल्या आहेत.
पुढील आवृत्त्यांचे व प्रकाशनाचे सर्व अधिकार श्री अगस्ती देवस्थान ट्रस्ट अकोले यांना देण्यात आले आहेत. मात्र अनुवादाचे वा रूपांतराचे अधिकार सौ. उषा सहस्रबुद्धे यांच्याकडे ठेवण्यात आले आहेत.



## (१)

**अद्वैताचा मार्ग । कली साधियेला । अगस्त्यांची दिंडी । पंढरीला ।।१।। आश्रमी दाटतो । अगस्त्य भक्त मेळा । पालखी खांद्याला । लागाविशी ।।२।। काशी नगरीत । संबोधी विठ्ठला । ज्ञाना प्रकटावा । कलियुगे ।।३।। लेकुरांच्या सवे । मुनिही चालला । मुखे घोष होई । ज्ञाना तुका ।।४।। सत्य युग वाट । कली युगी चाले । अगस्त्य मार्गाने । अनिल म्हणे ।।५।।**

## (२)

**सिद्ध सत्व साक्षी । अगस्त्य भगवान । लोपा प्रतिव्रता । येथे वसती ।।१।। वसति आश्रमी । कार्य सिद्धी करी । कृपेची साऊली । सर्वांसाठी ।।२।। सत्यनिष्ठा व्रती । सेवा अनुगामी । सुखरूप होती । अनिल म्हणे ।।३।।**

## (३)

**महायोद्धा ऋषी । त्रिकालज्ञ योगी । नाडी ज्ञाने करी । सावधान ।।१।। चराचरा केले । तेणे संयोजीत । भूमी सुफलित । त्याच्या कार्ये ।।२।। तळी नद्या विहिरी । जलयुक्त केल्या । जीवन फुलविण्या । अनिल म्हणे ।।३।।**

(४)

अगस्त्य अगस्त्य । मुखे जपा नाम । सुफल साधन । प्रपंचाचे ।।१।। अगस्त्या भजावे । अगस्त्याशी गावे । अगस्त्या वंदावे । जीवे भावे ।।२।। आश्रमी अगस्त्य । डोळ्यांनी पाहावा । कानांनी ऐकावा । वेदघोष ।।३।। अनुसार करा । अगस्त्य विद्येचा । प्रपंच सुखाचा । अनिल म्हणे ।।४।।

(५)

नाना रोग व्याधी । संसार उपाधी । अगस्त्य औषधी । लावी वेगी ।।१।। नको धरू शंका । नको तैसी चिंता । अगस्त्य साधता । जाती वेगी ।।२।। घर दार वित्त । कन्या पुत्र मित्र । साधती निशंक । मुनी योगे ।।३।। सिद्धांचाही सिद्ध । सद्‌गुरू साचा । प्रपंची सिद्धता । अनिल म्हणे ।।४।।

(६)

अगस्त्या परता । नाही सद्‌गुरू । नरजन्म सार्थकु । भक्तांसाठी ।।१।। सृष्टीचे चालन । भूतांचे पालन । ब्रह्म विष्णू महेश । अगस्त्य रूप ।।२।। चला झडकरी । अगस्त्या शरण । साधावे साधन । कर्म धर्म ।।३।। प्रपंच परमार्थ । एकरूप करी । निवारूनी भ्रांती । अनिल म्हणे ।।४।।



(७)

कुंभोद्‌भव झाला । उर्वशिचा पुत्र । मित्रावरुण पौरुष । प्रकटले ।।१।। वशिष्ठांचा भ्राता । जन्मला मानसी । निपाती कालकेशी । दिव्यपणे ।।२।। आचमनी प्याला । सागर अगस्त्य । निवारिले भय । देवांचेही ।।३।। देवांचा तो त्राता । मानव कैवारी । सृष्टी करी अवघी । सुफलित ।।४।। देवदानवांना। वंदनीय झाला । सांभाळी मानवा । अनिल म्हणे ।।५।।

(८)

पर्जन्य चक्राचा । स्वामी हा अगस्त्य । इंदमरूत सखा । ऋषी मान ।।१।। प्राण्यांचा पालक । वन संरक्षक । जलौघ चालक । मुनी मान्य ।।२।। आश्रम स्थापिला । प्रवरेच्या तीरी । करी संचालित । त्रिभुवन ।।३।। वेद रचयिता । विद्या प्रदाता । आरोग्य प्रदाता । त्रिकालज्ञ ।।४।। जाऊनी शरण । सोपवा जीवन । दुःख निवारिल । अनिल म्हणे ।।५।।

(९)

राम बाण दिला । रघुवीरा करी । दिव्य वज्र देई । त्याच्या सवे ।।१।। अक्षय बाण भाता । सोपवी रामाला । रावणारी केला । भयमुक्त ।।२।। रामासवे जाई । सिंधू तीरा

घरी । शिव शक्ती देई । रामा हाती ।।३।। अहंकार दमन । रावणाचा केला । गोत्रज तारला । रामा हाते ।।४।। महा धनुर्योद्धा। ऋषी हा अगस्त्य । चिर शांती निष्ठ । अनिल म्हणे ।।५।।

## (१०)

रघुवीर सत्य । वचनाला निष्ठ । झाला व्यंकटेश । कलियुगी ।।१।। वेदवती साठी । सीता लक्ष्मी येई । पद्मावती देई । बालाजीस ।।२।। अगस्त्य आश्रमी । लक्ष्मीच्या सहाय्ये। वचनाची पूर्ती । मुनी योगे ।।३।। त्रेताच्या कार्याची । पूर्ती कलियुगी । अगस्त्याच्या हस्ते । झाली झाली ।।४।। व्यंकटाचली हो । नित्य हो दर्शन । मानव पावन । अनिल म्हणे ।।५।।

## (११)

इल्वल वातापि । शोषक राक्षस । भ्रष्टवी मेदीनी । अहर्निश ।।१।। ऋषी मुनी योगी । भोजनाच्या मिषे । वातापीच्या पोटी । ठार होत ।।२।। ऋषींच्या पोटात । वातापी समीश । उदरभेट करून । ऋषी मारी ।।३।। ब्रह्मा विष्णू शिव । त्रिसिद्ध अगस्त्य । धावला राक्षस । वधावया ।।४।। साठवी वातापी । पोटात लीलया । योगाच्या सहाय्ये । पचविला ।।५।। ऋषी लोक सारे । बोलावी परत । अगस्त्याच्या कृपे । जीवनमुक्त



।।६।। गर्व अहंकार । शोषणादि दुःख । अगस्त्य निवारी । अनिल म्हणे ।।७।।

## (१२)

उत्कट उन्मन । घ्या अगस्त्य नाम । वैकुंठ कैलास । आश्रमी एका ।।१।। त्रिभुवन त्राता । अगस्त्य मुनि योद्धा । शरण जावे तया । एकचित्ते ।।२।। संसार प्रपंच । दुःखाचे आगर । अगस्त्य कृपावंत । निवारील ।।३।। अगस्त्यांचा मार्ग । ज्ञानमय कर्म । माया मोह रिपु । नष्ट होती ।।४।। अगस्त्य मार्गी जाय । निर्विकल्प सुखे । कळीकाळ कापे । अनिल म्हणे ।।५।।

## (१३)

त्रिदेव सहित । पंचतत्त्वे दिव्य । प्रकट स्वरूप । अगस्त्यांचे ।।१।। मित्रावरुण ऋषी । जाहले निमित्त । उर्वर्षेय प्रकट । कुंभा ठायी ।।२।। दिव्य तो सोहळा । मानसी जाहला । अगस्त्य प्रकटला । मध्या तूनी ।।३।। अवशिष्ट भागी । वशिष्ट विख्याती । मान दिला त्याते । सप्तर्षीत ।।४।। दिव्य ते कर्तृत्व । अमोघ वक्तृत्व । ऋषीवेद सिद्ध । उपवेदी ।।५।। त्रिदेवांचे कार्य । एकलाचि करी । अग्नी सूर्य वायू । त्याचे ठायी ।।६।। स्वयंभू जाहला । ब्रह्म मान पुत्र । सप्तर्षी विख्यात । प्रज्ञावंत ।।७।। स्वपत्नी योजिली ।

स्वतः सिद्ध केली । मुद्रा चराचरी । शोधूनिया ।।८।। लोपामुद्रा झाली । सती पतिव्रता । लोपवूनी मुद्रा । अगस्त्य गामी ।।९।। त्रिशक्ती मिळूनी । प्रकटली साध्वी । अगस्त्य आश्रमी । कुळ माता ।।१०।। अगस्त्यांच्या योगे । निवडिले गोत्र । पोटी दिव्य पुत्र । दृढस्यूत ।।११।। मनु उद्धारक । सृष्टीचा नियंता । गोत्र, कृषीधर्म । सांभाळी तो ।।१२।। त्रिदेव त्रिशक्ती । करिती प्रशंसा। अद्‌भूत अविनाशी । अगस्त्य तत्त्व ।।१३।। जीवनाचा स्वामी । जीवनाचा योगी । सिद्ध ऋषी मुनी । धनुर्योद्धा ।।१४।। सर्वयुगी सत्ता । नाडी संहितेचा । सर्वयुगी सत्ता । अनिल म्हणे ।।१५।।

## (१४)

वने नि उद्याने । जलाचे प्रवाह । करूनी प्रेरित । कल्याणक ।।१।। चहूखाणीं जीव । त्याच्याने नियंत्रित । सर्वसंयोजक । सिद्ध ऋषी ।।२।। जावे त्या शरण । भोगावे जीवन । करिता नित्य कर्म । अनुसरावे ।।३।। कर्म ज्ञानवान । अगस्त्यांच्या योगे । प्रपंची परमार्थ । अनिल म्हणे ।।४।।

## (१५)

लोपवूनी मुद्रा । पति अनुगामी । वेदी आश्रमी । लोपामुद्रा ।।१।। लोपामुद्रा सती । दिव्य गोत्र माता । दिव्याद्‌भूत पुत्र । दृढस्यूत ।।२।। चराचर शक्ती । दिव्य शक्ती मुद्रा । जगन्माता लोपा । कृपा मूर्ती ।।३।। सांभाळी चहूखाणी । ती माता सृष्टीची । सावळी लेकरांची । अनिल म्हणे ।।४।।

## (१६)

अगस्त्य अवतार शंभू महादेव । विष्णू ब्रह्मतत्त्वामार्गदावी ।।१। पर्जन्याचा देव इंद्रमरुताचा । वादसंपवूनी ऋतुचक्रा योजी ।।२।। मेरुचिया योगे चंद्रसूर्य गती । पाहूनिया गर्वे विंध्य अल्पमती ।।३।। वाढ वेगे रुद्ध चालली प्रगती । गुरूआज्ञे विंध्य वाकवूनी ।।४।। मानसकुंभ सुफलित झाला । भूमी सांभाळाया सुजलासुफला ।।५।। विष्णुब्रह्मतत्त्वे दिव्यरूप झाले । देव दानव मानव शरणा आले ।।६।। अनिल म्हणे अवघी परतत्त्व लीला । त्रिदेव मांडती अगस्त्य रूपा ।।७।।

## (१७)

नवा मनू चालविण्या ब्रह्मा वेग झाला । प्रकटवी मानसी ऋषीलोका ।।१।। परब्रह्म प्रेरणे ऐसे या सृष्टीला । रूप दिले ऐसे भूलोका या ।।२।। चराचरा जाग आली अहंकार दुणावला । चौऱ्यांशीचा फेरा सुरू झाला ।।३।। चौऱ्यांशी फेऱ्यात जीव कासावीस झाला । दुःखाचा डोंगर ऋषी ऐसा चिंतावला ।।४।।

कारुण्याने देवाच्या या वेदान्त दाटला । ऋषी व्यवस्थापनाने अनिल सुखावला ।।५।।

(१८)

लोक आले आश्रमात । मुनी चरणी लोळत ।।१।। घोषे निनादे अंबर । ऋषी शक्ती होई प्रकट ।।२।। सुख दुःखाचे निश्वास । गुरू कृपे समाधान ।।३।। संकटांचे हे पर्वत । एका दृष्टी पार होत ।।४।। अनिल म्हणे शरण । जावे अगस्त्या लागून ।।५।।

(१९)

तारी तारी हो अगस्त्या । ऋषीवरा मायबापा । आलो तुझीया चरणा । समर्थ योद्धा तारक तू ।।धृ।। त्वा तारीले ऋतुचक्रा । बोधून इंद्र मरुता । तारीले त्वा चंद्रसूर्या । संबोधूनी विंध्यराजा ।।१।। त्वा तारीले देवेंद्राला । नमविले कालकेशा । प्राशूनीया सागराला । नष्ट केले अहंकारा ।।२।। तारीशी तू विप्लराज्ञी । विजयश्री दे खेचूनी । एकानिशी उभे करी । सुवर्णपदा लावूनी ।।३।। मी तर दुर्बल खरा । प्रपंचपाशी गुंते पुरा । तारूनिया या पामरा । म्हणे अनिला उद्धारा ।।४।।



(२०)

पवित्र ते क्षेत्र । सिद्ध तेचि पीठ । ऋषी मुनी अगस्त्य। जेथे प्रकट नित्य ।।१।। अमृत वाहते । त्याच्या कार्यासाठी । सिद्धेश्वर जेथे । सहाय्य करी ।।२।। ऋतुचक्र नित्य । चंद्रसूर्य साक्षी । इंद्र मरूत राही । सेवा व्रती ।।३।। प्रपंच प्रलय । त्याच्या आज्ञे लागी । असती तत्पर । अनिल म्हणे ।।४।।

(२१)

ॐ अगस्त्यैनमः । मंत्र पै सोपा । प्रसन्न मुनिवर । शीघ्र गति ।।१।। शुद्ध हेतु ठेवा । पायी अनन्य व्हा । ताप पायी घाला । श्रद्धा पूर्ण ।।२।। सत्यतो संकल्प । सिद्ध करी पूर्ण । क्षण ना विलंब । त्याला लागे ।।३।। ग्वाही अनिलाची । भक्ताला । सांभाळी । संकटे सारूनी । सर्वकाळ ।।४।।

(२२)

सांडूनि अवघा हो संशय । जावे अगस्त्या शरण । मायबाप बंधू सखा । गुरू त्राता ईश्वर ।।१।। सिद्ध योगी ऋषी मुनी । अगस्त्य रूपे शूलपाणी । त्याशी विसंबा विसंबा । संसारी मार्ग हो मोकळा ।।२।। सम दृष्टी योगी राज । नाही जात पात लिंग । चराचरा तो सांभाळी । विवेकाने पालन करी

।।३।। धन धान्य पीक पाणी । अगस्त्य कृपे फुले धरणी । सुखदुःखा तोचि धनी । अनिल म्हणे लागा चरणी ।।४।।

(२३)

प्रवरेच्या तीरी बाई आश्रमी । जावे ऋषी मुनिच्या धामी। रामसीता सवे लक्ष्मुमण । भेटे लोपा अगस्त्या लागून ।।१।। बाणभाता वज्र रामबाण । देई योगी आशीर्वचन । अहंकारी जरी दशानन । होई पराभूत दारूण ।।२।। मनु वेढीला वेढीला ग । रिपु पाशी गुंतला ग । पाठी लागे भोग पिशाच्य । कोण कुंठवील त्यास ।।३।। एक त्राता तोचि अगस्त्य । मारी अहं भोग राक्षस । त्यासी जावे एकचित्त शरण । अनिल म्हणे घ्यावे समाधान ।।४।।

(२४)

मुनी अगस्तींच्या कृपे । संकट सागरही सरे ।।१।। आश्रमी प्रवरा तीरी । घ्यावी याची अनुभूती ।।२।। शत्रू हाती परागंधा । ऐसा पराक्रमी योद्धा ।।३।। व्याधी समूळ हरपती । नाम अमृत घ्या ओठी ।।४।। अनिल सांगे एक खूण । धरा अगस्त्य चरण ।।५।।

(२५)

संकट मोचक ऋषी म्हणूनी । मी दृढ या चरणी । न हो



करुणा तरीही अजुनी । तळमळतो मी मनी ।।१।। पाण्यावीन हे रान कोरडे । कभीन्न कातळ उडे । नवकृपे दगड कोरडे । पाझर केव्हा फुटे ।।२।। पुन्हा निर्मिला सागर प्राशूनी । अशी तुझी थोरवी । श्रमलो श्रमलो खोद खोदूनी । कशी तुझी थोरवी ।।३।। सत्वर मुनीवर या हो धावूनी । पाझर फुटू दे झणी लाज राख अनिला सांभाळूनी । शेतमळे फुलवूनी ।।४।। माय बाप सखा बंधु गुरू । तू या कृषी जीवनी । घेई रे उदरी सामाऊनी । करूनी कृपा साऊली ।।४।।

(२६)

ऋषीमुनी पान्हावला । अवघा फुलला निसर्ग ।।१।। कृषीवले तृप्त झाली । तृप्त झाली गायी गुरे ।।२।। तुडुंब झाली विहीरी तळी । नद्या नाले वाही दुथडी ।।३।। माता लोपा होई तृप्त । खेळे आश्रमी दृढस्यूत ।।४।। ग्राम नगरे आनंदली । आनंदले अवघे जन ।।५।। सद्गुरूची कृपा झाली । अनिल सृष्टी पावन झाली ।।६।।

(२७)

अनाचार दंभाचार । भ्रष्टाचार माजे थोर । येई धावत अगस्त्या । संपविण्या व्यभिचार ।।१।। लपलासे सागरात ।

कालकेशी अति क्रूर । छळीतसे देवामनुजा । उद्ध्वस्त होई जनजीवना ।।२।। प्राशूनिया सागरास । कालकेशी मारीयेला ।। ऐसा योद्धा तू समर्थ । तारीयले मानव देव ।।३।। शूरपद्म भयानक। इंद्रा लावी पळवून । वर्षोवर्षी अवर्षण । धरणी झाली भयाकूल ।।४।। अहंकार केला नष्ट । शरण आला राक्षस भ्रष्ट । त्यासी करी लोक निष्ठ । कावेरीशी मार्गे न्याया ।।५।। अनाचारी अति क्रूर । इल्वल वातापि निष्ठूर । मारीयेले किती ऋषी । तैसे साधू संत जन ।।६।। पिळूनिया लोकालागी । भरीतसे स्वभांडार । गिळूनिया वातापिशी । उदरी केला रे हजम ।।७।। इल्वलाशी दंडीयेले । मुक्त केले ऋषी लोक । ऐसा येई बा धावून । करी मुक्त भवसागर ।।८।। कलियुगी महाघोर । पोषताती परस्पर । अशांत हे जनजीवन। श्रद्धा गेली मावळून ।।९।। अनिल विनवी परोपरी । धावा पावा होसत्वरी । दंडूनिया भ्रष्टाचारी । जीववावी भूमी सारी ।।१०।।

## (२८)

अगस्त्य कृपेने झालोसे पावन । देही हा प्रकट निज आत्माराम ।।१।। माझे गयावळ लोपले विरून । विश्वी विश्वंभर निज आत्माराम ।।२।। भव दुःख सारे हरपले मन । आत्मा चराचरी निज आत्माराम ।।३।। योग याग कर्म नको तीर्थाटन । अगस्ति अनिल निज आत्माराम ।।४।।



## (२९)

मुनी आश्रमी स्वयंभ । वेद कर्म झाले स्फूट ।।१।। यज्ञ याग तप सिद्धी । आयुर्वेद विद्या विधी ।।२।। मंत्र तंत्र शत्र निधी । नित अभ्यास आवधी ।।३।। ऋषी योगी त्रिकालज्ञ । देई बालकांना ज्ञान ।।४।। म्हणे अनिल अचाट । सर्व शक्ती सर्वां भेट ।।५।।

## (३०)

मान मान्य हा मांदार्या । झाला मानसी प्रकट ।।१।। वशिष्ठांचा ज्येष्ठ बंधू । ऋषी मुनी ऐसा साधू ।।२।। त्रिदेवांचे एक रूप । शक्ती थोर हो अमुप ।।३।। ऋतुचक्र जो स्थापिता । हा सृष्टी भाग्य विधाता ।।४।। हा पर्जन्याचा नियंता । जल ओघ हा निर्माता ।।५।। आयुर्वेद धनुर्वेद । नाडी शास्त्राचा उद्गाता ।।६।। अमृत आणि धरा । करी मानव उद्धारा ।।७।। अनिल म्हणे शरण । धरा अगस्त्य चरण ।।८।।

## (३१)

घेता अगस्त्यांचे नाम । काळ कापे हा दारुण ।।१।। घेता अगस्त्यांचा बाण । नाशे अहं तो रावण ।।२।। घेता अगस्त्यांचे तीर्थ । भव रोग होती व्यर्थ ।।३।। घेता अगस्त्यांची

विद्या । जळे अज्ञान अविद्या ।।४।। घेता अगस्त्यांचे नाम । अनिल म्हणे होई धन्य ।।५।।

## (३२)

ऐसा ऋषी हा प्रचंड । निर्मिलासे भरतखंड ।।१।। जम्बुद्विपात संचार । नित्य करी हा साचार ।।२।। चतुर वक्ता सिद्ध योद्धा । काळ दावी अहं दैत्या ।।३।। क्रतु पुलह पुलस्त्य । घेई ऋषींना कवेत ।।४।। दिशा उत्तर दक्षिण । जोडी सर्वा मैत्री पूर्ण ।।५।। भरत राष्ट्राचा निर्माता । ऋषी अगस्त्य हा त्राता ।।६।। प्रेरी रामकृष्ण पांडवा । वानर वन मानवा ।।७।। देई असूरा दंडन । अहं द्वंद्वेही खंडून ।।८।। नद्या पर्वत श्वापद । सर्वां लावियेली शिस्त ।।९।। विश्वा अवघे साधण्या । नित्य समाधान देण्या ।।१०।। एक अगस्त्य हे तत्त्व । साधी विश्वकल्याण नित्य ।।११।। अनिल म्हणे साधा साधा । शक्ती भक्ती सद्‌भावा ।।१२।।

## (३३)

ऋतुचक्रा साठी । यज्ञ नित्य अगस्त्य करी । हविश्याचा गोऱ्हा । अगस्त्यानी धरिला पुरा ।।१।। अनिवार तंटा । इंद्रमरूता सुरू होता । विचक्षण ऋषी । वाक्‌चातुर्ये समझावी ।।२।। समाधानी दोन्ही । एकमेका सन्मानुनी । अगस्त्यांना दिले ।



वचनी पुरते गुंतले ।।३।। पुलकीत सृष्टी । अनिल म्हणे केली तुष्टी । अगस्त्यांनी केले । दिले यज्ञफल चांगले ।।४।।

## (३४)

आठवा तो ऋषी । ध्यास दिननीशी । कल्याण सर्वांशी । सर्वकाळ ।।१।। पर्जन्याचा स्वामी । आरोग्याचा ज्ञानी । सर्वकाळ वाणी । सत्य होय ।।२।। इंद्राचा हा सखा । कारुण्य पुतळा । प्राणी संरक्षिता । मुनी योगी ।।३।। मित्रावरुणी पुत्र । सर्वांभूती मित्र । पाजळी तो शस्त्र । दुष्टांलागी ।।४।।त्रिदेव प्रकट । झाले एकवट । राखी सृष्टी नीट । सर्वांसाठी ।।५।। गुरू अनिलांचा । शिवरूप साचा । कल्याण कारिता । विश्वासाठी ।।६।।

## (३५)

शल्य चिकित्सक । आरोग्य रक्षक । त्रिकाल तारक । सिद्ध योगी ।।१।। स्वामी सागराचा । निर्मिक शस्त्रांचा । काळ हा रिपूंचा । देव ऋषी ।।२।। दशदिशा झाल्या । भयमुक्ता साऱ्या । शक्ती आकळल्या । पंचत्वाच्या।।३।। सृष्टी सुफलित। नित्य पिके शेत । अनिल अगस्त्य । कृपा त्याची ।।४।।

(३६)

अमृताच्या तीरी । अगस्ती आश्रम । अकोले नगर । धन्य धन्य ।।१।। सिद्धेश्वर साक्षी । अगस्ती साधनी । मंत्र तंत्र शस्त्री । निर्माता तो ।।२।। पर्जन्य नियंता । आरोग्य विधाता । सृष्टीचा रक्षिता । अगस्त्य माझा ।।३।। अनिला संगती । साधक चरणी । ठेवी कृपा पाणी । अगस्त्य माझा ।।४।।

(३७)

चिंता व्यथा दैन्य सारा । कृपा करा योगीराजा ।।१।। आश्रमी मी आलो आता । कृपा करा हो समर्था ।।२।। भवपाशी विगुंतलो । आनंदला दुरावलो ।।३।। शरीराच्या वासनांना । कसा आवरू कळेना ।।४।। क्षणोक्षणी दीन हीन । तात्रा कोण तुह्याविण ।।५।। सारे काही तुझ्या पायी । अनिला तारीशी।।६।।

(३८)

रात्रंदिन करा युद्ध अघोर । सर्वथा संपवा भ्रष्टाचार ।।१।। शोषक राक्षस ठार करा सारे । लक्ष्य घ्या त्यांचे शस्त्राधारे ।।२।। शस्त्रास्त्रांचा स्वामी हा अगस्त्य । बळ देत युद्धा अखंडित ।।३।। रघु तृत्सु पाण्ड्य ऐसे कितीतरी । अगस्त्य कृपे फेडीती पापराशी ।।४।। प्रपंची परमार्थी संघर्षदारुण । लढुनी साधावा



तो पुरुषार्थ ।।५।। करा अनुसार अगस्त्यांचा मार्गा । अनिल म्हणे जिंका काया मन ।।६।।

(३९)

श्रमिकांचा त्राता । कृषिवल देव । श्रम प्रतिष्ठित । तुझ्या कृपे ।।१।। हातात कुदळी । शिव धनु खांदी । करुणा हृदयी । परिपूर्ण ।।२।। इंद्राला प्रेरित । मरुता विनवित । ऋतुचक्र योजित । पृथ्वीसाठी ।।३।। कर्मवान ज्ञानी । सोहंभाव मनी । सद्गुरू ज्ञानी । मानवाला ।।४।। विज्ञानाचा भोक्ता । ऋषी पूर्ण द्रष्टा । सोहं सिद्ध कर्ता । अनिल म्हणे ।।५।।

(४०)

महा योगी सिद्ध । जगीया प्रसिद्ध । सिद्धी दासी सर्व । रिद्धी पूर्ण ।।१।। अपार महिमा । प्राशी वरुणालया । रूप साधुनिया । विराट हे ।।२।। पंचतत्त्व योगी । आकळून योजी । निर्विघ्नता साधी । सृष्टी साठी ।।३।। यज्ञात पर्जन्य । पर्जन्यी ते अन्न । जीव भूतमात्र । सांभाळीतो ।।४।। सुष्टांचा कैवारी । दुष्टा महाअरी । गणेश कार्तिकी । भ्राता साजे ।।५।। शिवरूप पूर्ण । परब्रह्म रूप । भोगिता अद्वैत । कार्यमग्नी ।।६।। उग्र जरी ऋषी । भोळा सांब परी । त्रिकालज्ञ न्यायी । अनिल म्हणे ।।७।।

(४१)

पशूंचे पालन । जल प्रसारण । वन संवर्धन । साधक हा ।।१।। मुनी त्रिकालज्ञ । सांगे भाग्य ज्ञान । नाडी संशोधन । मार्ग दावी ।।२।। देव दानवात । ऋषी सर्व मान्य । मानवा कल्याण । लक्ष्य त्याचे ।।३।। कूप वारी मागा । धन धान्य मागा । गृह वित्त मागा । विघ्न हर्त्ता ।।४।। रणी प्रलयंकारी । जनी कृपानिधी । सत्य निष्ठ योगी । अनिल म्हणे ।।५।।

(४२)

योगीयांचा राजा । मान मान्य मांदार्य । ऋषी योगी सिद्ध । अगस्त्य हा ।।१।। सोम याग साधी । यज्ञ सत्र मार्गी । निशिदिनी समाधी । मूर्ती करुणा ।।२।। कर्मनिष्ठ योगी । अनितीस दंडी । कैवल्याचा भोगी । लोपा पति हा ।।३।। दानवांना दावी । मार्ग हा सत्वाचा । मार्ग वैष्णवांचा । अनिल म्हणे ।।४।।

(४३)

ऋषी कर्मशील । गुरुकुल कर्मशील । माता कर्मशील । आश्रमी या ।।१।। नित्य असे कर्म । येथे ज्ञानवान । होऊनी उन्मन। कार्य साधी ।।२।। सोम रस दिव्य । यज्ञ होती भव्य । साधन ते गव्य । आश्रमी या ।।३।। येथे रुग्ण सेवा । येथे गौ



सेवा। येथे कृषी सेवा । नित्य चाले ।।४।। जलधी जीवन । सरिता विसर्जन । मेघांचे वर्षण । स्वामी साधे ।।५।। सोहं सद्‌गुरू । शिष्य मार्गाचारू । निष्काम व्यवहारू । ज्ञान मार्गी हा ।।६।। अनिलाची सांगी । ठेवा ध्यानी मनी । अगस्त्य चरणी । निवांत व्हा ।।७।।

(४४)

आश्रमात यावे । हर्षे बागडावे । कोड पुरवि सारे । लोपामुद्रा ।।१।। लोपामुद्रा माता । सांभाळी बाळका । देई शक्तिमत्ता । अमोघ ही ।।२।। पतिव्रता माता । बळ ऋषी कार्या । मानुजा स्वायत्ता । तिचीया बळे ।।३।। माता कर्म कैसे । करावे नेमाने । संस्कारी बाळके । दिव्याद्‌भूत ।।४।। मातृकांची सर्व । शक्ति एक विध । पान्हावते नित्य । बाळकांसाठी ।।५।। लालन पालन । आश्रमी साधन । थोर गुरुकुल । अगस्त्यांचे ।।६।। अनिल म्हणे अंकी । माता ही सांभाळी । नाडी शुद्ध देई । बालकांना ।।७।।

(४५)

अगस्ती आश्रम ज्ञानाचे माहेर । श्रमबुद्धी दोही होती प्रतिष्ठित ।।धृ।। व्यवहार विद्या दाता सद्‌गुरू । कर्मवान धीरू अगस्त्य हा ।।१।। वर्तनी वेदान्त सांगे हा ऋषीवरू ।

यज्ञकर्मकारकू अगस्त्य हा ।।२।। न्याय नीति कला ज्ञान विज्ञान । टाकूनी अज्ञान निववी ऋषी हा ।।३।। अनिल म्हणे यांचा मार्गाचा निर्धार । फलद्रुप प्रपंचा आधारू हा ।।४।।

(४६)

अगस्त्य हा देव । अगस्त्य मानव । दोही कडे एक । ऋषी मुनी ।।१।। शिवे अज्ञापिला । गौरी निरोपिला । भूमीला लाभला । संरक्षक ।।२।। सृष्टीचा नियंता । जनांचा पाळिता । सखा, बंधु, त्राता । सर्वांभूती ।।३।। अद्वैताचा मार्ग । निष्काम ते कर्म । नृषांना प्रेरक । राजमार्गी ।।४।। शरण अनिल । लोकांसी आनंद । गोविंद स्वरूप । ब्रह्म रूप ।।५।।

(४७)

माझा मनोदय । दारा पुत्र वित्त । सत्ता घर दार । प्रतिष्ठाही ।।१।। राग द्वेष मनी । सूड निशिदिनी । मस्तर अभिमानी । माझे माझे ।।२।। धरूनि चरण । माझे हे मागणं । कृपाळू अगस्त्य । देतो म्हणे ।।३।। जगाचा संसार । चालवी अगस्त्य । मला विसंबेल । कैसे घडे ।।४।। माझ्या मनी माझे । जग हे कोणाचे । त्याचे माझे नाते । नाही नाही ।।५।। स्वार्थाच्या संसारी । अगस्त्य दातारी । ऐसा तू अज्ञानी । होऊ



नको ।।६।। कैवल्य करुणा । पसरवी जगा । ऐसा योगी राणा । अगस्त्य हा ।।७।। पुरविल कोड । निश्चित तू जाण । करावा विचार । सर्वात्मक ।।८।। त्रिदेवा नेमस्त । शिवरूप जाण । निवारील दुःख । भक्तांचे ते ।।९।। सर्वांच्या सुखात । मानविते सुख । कृपाळु अगस्त्य । अनिल म्हणे ।।१०।।

(४८)

माझीया प्रज्ञेची । नाही ऐसी ख्याती । ऋषी प्रेरी मती । आज्ञांकित मी ।।१।। विश्वाचा नियंता । सद्गुरू ऐसा । देतसे निरोपा । लोकां लागी ।।२।। व्हावे क्रियाशील । व्हावे स्वार्थ हीन । सेवा भावी मन । सर्वांठायी ।।३।। जगत सुखाचा । विचार बाळगा । येई सुख ठेवा । तुम्हा साठी ।।४।। विश्वकुटुंबाचा । धुरेचा बैसणा । ऋषी योगी राणा । त्राता तुझा ।।५।। होऊनी निष्काम । भोगी परंधाम । मुनी दयाघन । अनिल म्हणे ।।६।।

(४९)

अद्भूत हा जन्म । अद्भूत हे कर्म । जाणा जाणा वर्म । अगस्त्यांचे ।।१।। मित्रावरुणी पुत्र । ज्ञात उर्वषेय । कुंभोद्भव मान्य । मांदार्य हा ।।२।। इंद्रे मागितला । त्रिदेवे प्रेषीला । गौरी ने

अंकिला । शिवस्वरूप ।।३।। सद्गुरू त्या शिव । शिरोमणी सिद्ध । प्राशिला सागर । आचमनी ।।४।। राखी जलचरा । स्थापुनि सागरा । कालकेशी असूरा । नष्ट केले ।।५।। सत्याचा हा त्राता । अविद्या भस्मिता । विश्वसंरक्षिता । अनिल म्हणे ।।६।।

## (५०)

ऋषी करुणामूर्ती परत्म्यासमान । राक्षसा उन्मत्त सुदर्शन ते । प्रसन्न होती जैसे शिवाच्या समान । नराधमांसाठी रुद्रचि ते ।।१।। निर्मिला ऋषी लोक नित्य । लोका सांभाळण्या विष्णूरुपे । संचालन करिती ब्रह्मामानसाचे । विक्षेपा प्रसंगे त्रिशूळ होती ।।२।। अगस्त्य ऋषी योद्धा महाशक्तीशाली । अहंकार उन्मत्ता दंडितसे । दीनांचा कैवारी ज्ञानियांचा परिपूर्ण । तो ना विसंबा आम्हाला ते ।।३।।

## (५१)

माझे सद्गुरू ऋषी । आहे प्रवरेच्या तीरी ।।१।। लोपा माता बरोबरी । लाभे कृपेची साऊली ।।२।। अगस्त्य मुनी शरण । पूर्ण लाभे समाधान ।।३।। आश्रमी हो विद्यादान । अर्थ सिद्धींचे कारण ।।४।। नका भांबावूनी जाऊ । पाठी उभा ऋषीमुनी राऊ ।।५।। असो कोणताही प्रश्न । भेदी अगस्त्यांचा



बाण ।।६।। उठा उठा त्वरा करी । लागा लोपापति चरणी ।।७।। सखा बाप बंधु आई । अनिल हा मुनि पाही ।।८।।

## (५२)

गुरुकुल हे आश्रमी । आहे प्रवरेच्या तीरी ।।१।। तेथ नांदे ते सद्गुरू । लोपामुद्रा ही अनुसारू ।।२।। जगताचा न्याय करी । विष्णू देखा खरोखरी ।।३।। जगनमाता ही माऊली । चित्त शक्ती खरोखरी ।।४।। ब्रह्म साकार त्रिकालज्ञ । अवघे ज्ञात त्या जीवन ।।५।। देव दानव मानव । एका दृष्टी पाहे सम ।।६।। कृषी आरोग्याचा दाता । संसाराचा भाग्य विधाता ।।७।। अनिल म्हणे व्हा जागृत । मार्ग दावीतो निश्चित ।।८।।

## (५३)

धन्य ती प्रवरा । धन्य तो आश्रम । जेथे अगस्त्य मुनि नांदतसले ।।धृ।। धन्य लोपामुद्रा । गुरुकुल माता । करिती साधना । जगदोद्धारा ।।१।। धनुर्वेद साधे । आयुर्वेद साधे । साधे कृषी ज्ञान । जगदोद्धारा ।।२।। धन्य ती साधना । संगीत निपुणा । धन्य शिवानृत्या । साधीतसे ।।३।। धन्य फल ज्ञान । धन्य ते जातक । त्रिकालज्ञ युगुल । तप मग्नी ।।४।। धन्य मी अनिल । होई गुरुकृपे । ऋषी ज्ञान स्वरूपे । सिद्ध करी ।।५।।

(५४)

ऋषी मुनी योगी सिद्ध । आश्रमीया असे नित्य । यज्ञकुंडीचा हा वारा । नित्य घालितो घुमारा ।।१।। अस्त्र शस्त्र सिद्ध होती । युद्ध ज्ञान संपादिती । गोशालेत हंबरती । पुष्ट धेनु पान्हावती ।।२।। आयुरारोग्य भाग्यज्योती । नाडी ज्ञान संपादिती । गुरू कुळी ऐशारीती । प्रज्ञावंत प्रकटती ।।३।। देव दानव मानव । ज्ञान घेती अपरंपार । अनिल म्हणे ज्योती दिव्य । अगस्त्यकृपे हो पावन ।।४।।

(५५)

सुंदर ते ध्यान । ऋषी योग मग्न । साधिता साधन । जगासाठी ।।१।। कमंडलु कुदळी । घेऊनिया हाती । ज्ञान सिद्ध करी । अगस्त्य हा ।।२।। जटाजुट माळा । रुद्राक्ष रुळती । गंध भस्म शोभे । शिवा जैसे ।।३।। विश्वाच्या कल्याणा । योगी सिद्ध जाणा । ऋषी अगस्त्य साधना । अनिल म्हणे ।।४।।

(५६)

भूतांचे पालन । सदा ज्ञानवान । कर्म हे निष्काम । साधावे हो ।।१।। भ्रष्टाचार सर्व । सर्वथा टाकून । साधा शुद्ध मन । सर्वकाळ ।।२।। व्यर्थ अहंकार । वर्जावा नेमस्थ । भूमी



जाण माये । खरोखरी ।।३।। पंचतत्त्व देव । दातृत्व महान । सारे ही घेऊन । माजावेना ।।४।। खलत्व सोडून । मन हो प्रसन्न । नरदेह पावन । करा नित्य ।।५।। अगस्त्यांची सांगी । न हो ही वावूगी । शुद्ध आचरावी । अनिल म्हणे ।।६।।

(५७)

वृक्षवेली तृण । त्यांचे माना ऋण । करावे संगोपन । मनोभावे ।।१।। इंद्रवायू दान । घ्यावे सांभाळून । करा नियोजन। थेंबोथेंबी ।।२।। साधनांच्या मस्ती । नका करू जास्ती । भूमी महा जननी । सांभाळावी ।।३।। तुझ्या सम सर्व । मायीली समान । नर देवामान । सांभाळी त्यां ।।४।। अगस्त्यांची सांगी। कृषीवला कानी । जीववी जननी । अनिल म्हणे ।।५।।

(५८)

पंचत्वाचा पिता । लोकां ठायी देखा । आत्माराम जाणा । मनोमनी ।।१।। सान थोर सारे । सृष्टीचीच बाळे । नरदेह लाभे । थोरपणे ।।२।। नरदेह नाही । भोगण्या सृष्टीशी । सांभाळावे तीशी । रामपणे ।।३।। देव ना दानव । असावे मानव । हृदी असो प्रेम । सर्वांठायी ।।४।। अगस्त्यांची सांगी। असो सम दृष्टी । खल नको मनी । अनिल म्हणे ।।५।।

(५९)

पशूपणा गर्व । दानवी उन्मत्त । होऊ नये नीच । हिंस्त्र पणे ।।१।। आत्मज्ञान शक्ती । निष्ठा सम भक्ती । आचरावी नीती । माणूसपणे ।।२।। ज्ञान कर्मवान । कर्म ज्ञानवान । प्रेम सेवा नेम । सर्वाठायी ।।३।। पुराणा प्रमाण । देव दानव द्वंद्व । टाकावे ते सर्व । माणूस पणे ।।४।। अगस्त्यांची सांगी । सार्थ करा ठायी । रामरूप होई । अनिल म्हणे ।।५।।

(६०)

व्यसन शोषण । धरावे ते त्याज्य । अन्यथा हो नष्ट । वातापि जैसा ।।१।। अहंकारे सारे । न धरा वेठीला । जाईल लयाला । सम कालकेशी ।।२।। शात्र ज्ञान सारे । भूतांच्या कल्याणा । नका होऊ रावणा । जैसे तुम्ही ।।३।। नरदेह आहे । स्वरूप त्रिदेवांचे । सृष्टीचलन साचे । राखा तुम्ही ।।४।। अगस्त्यांची सांगी । मने सांभाळावी । चराचरा जीवी । अनिल म्हणे ।।५।।

(६१)

अंगीचा विखार । दंश भयंकर । कापे चराचर । त्याच्या भये ।।१।। सर्पयोनी सारे । वशे सिद्ध केले । अमृत ते केले । रुग्णांसाठी ।।२।। भ्राता, धात्रा सखा । आज्ञेच्या योगाने । अगस्त्य



महाज्ञाने । सांभाळी त्यां ।।३।। सर्पसखा झाला । शिवरूप खरा । भूमी सांभाळाया । सिद्ध केला ।।४।। त्याच्या योगे केले । भक्तांचे पालन । दुष्ट निर्दालन । अनिल म्हणे ।।५।।

(६२)

वर्णाया स्वरूप ज्ञान नि वैराग्य । शब्द कैसे आणू सांगा सांगा ।।१।। शब्दांचा तो स्वामी अगस्त्य तामीज । शब्द योगे जातक सांगे सिद्ध ।।२।। ऋतुचक्र स्वामी पर्जन्य नियंता । इंद्र मरुत सखा स्वामी माझा ।।३।। सागर अहंकारी दंडीयेला त्याने । विंध्य येत शरण पायापाशी ।।४।। भक्तांच्या कांक्षा साऱ्या पुरवीतो । वंश सांभाळितो जीवे भावे ।।५।। सर्वांठायी त्याचे प्रेम असीम । कर्म वेदांत मुनी सांगतसे ।।६।। ब्रह्मांडात त्याचे असंख्य आश्रम । दर्शन दे सर्वां जेथे तेथे ।।७।। लोकांसाठी द्वार ज्ञानाचे उघडिले । आज्ञापूनी मज अनिल म्हणे ।।८।।

(६३)

सद्गुरू कृपा केली । अवघी काया धन्य झाली ।।१।। झाले नष्ट माझे पण।  ऋषी मग्न झाले मन ।।२।। त्याने धरिले बोटाला । अनंत विश्वे अनुभव दिला ।।३।। आज्ञा केली सद्गुरू अगस्त्ये । लेखणी सिद्ध करी त्याते ।।४।। ब्रह्मरूप अगस्त्य

मुनी । ऐसा साकारला ध्यानी ।।५।। वेदान्ताचा ज्ञान भार । मने व्यापितो अपार ।।६।। अनिल म्हणे त्वरा करा । लागा सद्‌गुरूच्या चरणा ।।७।।

(६४)

काया झाली आत्माराम । आत्मारामी मन विरून ।।१।। देह भोगी आत्मानंद । सद्‌गुरूकृपे देह भान ।।२।। आकारात सामावून । निराकार सांगे खूण ।।३।। अनुभवचा अनुभव । अनिल होई अगस्त्य रूप ।।४।।

(६५)

त्रिदेवांचा अवतार । एक अगस्त्य कैवल्य ।।१।। विश्वस्वरूप दर्शन । विश्व व्यापिता अगस्त्य ।।२।। अमृतवाहिनीच्या तीरी । निर्गुण सगुण हे होई ।।३।। अगस्त्य ऐसा ब्रह्मयोगी । स्वतः होई विश्वंभरी ।।४।। ऋषी जीवांचे जीवन । शब्द स्पर्शे हो साकार ।।५।। ऐसे धन्य जंबुद्विप । कुंभे प्रसविले अगस्त्य ।।६।। सृष्टी झाली सुखरूप । ब्रह्मानंदी डोले अनिल ।।७।।

(६६)

माझ्या मनीची आस । पुरवावी मान राज ।।१।। सृष्टी



होऊ द्या हो नियमित । अवघी व्हावी सुफलित ।।२।। षड्‌रिपुंचा बढीवार । त्यांना दंडा अनिवार ।।३।। सत्य प्रेम करुणेचा । होवो नित्याचा हुंकार ।।४।। अगस्त्यांनी द्यावे ज्ञान । अवघे होवो कर्मवान ।।५।। अनिल म्हणे हो सार्थक । घडो अगस्त्य सेवा कार्य ।।६।।

(६७)

जन्म मृत्यू फेरा देवाचिया हाती । असे तोवरी करू नका माती ।।१।। पाळावा तो धर्म न्यायाचा नियंता । अंध रूढी परता थारा नको ।।२।। प्रेम द्यावे प्रेम घ्यावे हाच खरा धर्म । श्रद्धा त्याग सेवा साधा कर्म ।।३।। धन दारा नाती दिल्या घेतल्याची । मोहाच्या ह्या गुंती न राहावे हो ।।४।। अगस्त्यांची सांगी त्याचे रूप तुम्ही । विवेकाची करणी अनिल म्हणे ।।५।।

(६८)

कळी काळा आम्ही नाही घाबरत । त्याचे अवसान दोन दिनी ।।१।। पराभव आम्ही नाही जुमानीत । त्याची का बिशाद आम्हापुढे ।।२।। सर्पास्त्र, अग्नीअस्त्र निर्मियेले त्याने । त्यानेचि निर्मिले ब्रह्म शिरसास्त्र ।।३।। अक्षयवेध अस्त्र निर्मून तयाने । रामबाण दिधला रामाहाती ।।४।। अक्षयबाणभाता

सोपवून हाती । दिव्य वज्रे रघुवीर भूषविला ।।५।। धनुर्विद्या ऋषीने कैसी पुष्ट केली । अस्त्रे ऐसी कित्येक प्रेरित केली ।।६।। भ्राता विघ्नहर्ता गणेशाचा शोभे । कर्तिका समान शूर योद्धा होये ।।८।। पाठीराखा ऐसा असता पाठीशी । भय कैसे आम्हा पापियांचे ।।९।। धर्म कर्म करिता सत्य निष्ट कोणी । दाखवा सम अगस्त्या नाही कोणी ।।१०।। अगस्त्यांची सांगी सर्व सेवा धर्म । अनिल म्हणे कर्म ओळखावे ।।११।।

(६९)

शापी अहंकारा दंडीतसे स्वामी । शरणागतापरी कारुण्यमूर्ती ।।१।। मणिमत दैत्या तैसे कुबेरा । ताटका मारीचा शोध शौर्या ।।२।। इंद्रपद भोक्त्या नहूशा दंडीले । श्वेतासी तैसेच दंडीयेले ।।३।। शूरपद्मा त्याने आणिले शरण । मागुती सांभाळी देई शिष्यपण ।।४।। दंडूनी मागुती शापमुक्त करी । खलत्व सांडुनी पावन करी ।।५।। उग्र परि वत्सल मातेसम मुनी । अनिल म्हणे शरण त्याच्या पायी ।।६।।

(७०)

भूत वर्तमान भविष्य ज्या आधीन । पालखी विराजला ऐसा ऋषी सिद्ध ।।१।। वेदान्त निरोपिला आपुल्या आदेशे । कृष्ण ज्ञानदेव होई सर्वा मुखे ।।२।। शिवाशिवद्वैत ऐसा योगी राणा । कलीयुग उद्धराया साधी भक्तियोगा ।।३।। ज्ञानोबा तुकोबा टाळ नि मृदंग । अगस्त्य दिंडीच्या दशदिशा दुंदुभ ।।४।। ऋषी मुनी सिद्ध होई भक्त राज । मिरवी भागवत चंद्रभागा योगपीठ ।।५।। देई परामर्श साधा ज्ञान कर्म । हित उठा साधा अनिल म्हणे ।।६।।

(७१)

अंजुळीत अवघा । सागर प्राशिला । विंध्य धरी पाया । अगस्त्यांच्या ।।१।। मित्रावरुणी पुत्र । अवघा शिवरूप । ब्रह्मा विष्णू शिव । प्रकट अगस्त्यरूपे ।।२।। देव, मुनी सिद्ध । योगी क्रियाशील । निज कार्ये सिद्ध । सप्तर्षित ।।३।। त्यासी अनुसरा । कर्तव्य तत्परा । हाती आणा दैव । अगस्त्य कृपे ।।४।। नर देह लाभ । व्हा हो नारायण । सांगती मुनिवर । अनिल म्हणे ।।५।।

(७२)

लोभ, मोह द्वेष । राग निंदा कूट । टाकावे खलत्व । मनातूनी ।।१।। नित्य करा यज्ञ । कर्म ज्ञानवान । न्याये आचरण । साधा साधा ।।२।। दुबळेपणा सर्व । असे सदा वर्ज्य । शक्ती उपासक । असावे हो ।।३।। त्या साठी काही ।

सायास लागती । असावा तो मनी । एक ध्यास ।।४।। व्हावे भूत मय । करुणा सुयोग । चिंतावा अगस्त्य । अनिल म्हणे ।।५।।

(७३)

मुनि सिद्ध ऋषी । अगस्त्य सर्वत्र । पाठी असे नित्य । भय टाका ।।१।। नाम त्याचे शत्र । नाम त्याचा मंत्र । कर्म एक तंत्र । निष्कामी व्हा ।।२।। सूर्य चंद्र इंद्र । वातापि नहूश । उद्धरि अनेक । कृपादृष्टी ।।३।। नित्य वर्तमान । स्वामी हा अगस्त्य । कसा विसंबेल । भक्तांना तो ।।४।। बंधू माता पिता । सोयरा आपुला । स्वामी हा लोपेचा । अनिल म्हणे ।।५।।

(७४)

प्रतिक्षणी स्वामी । सर्वथा घ्या मनी । निवारील राशी । संकटांच्या ।।१।। असा मात्र नित्य । स्वकर्मा तत्पर । व्यर्थ ना हो काळ । कदापिही ।।२।। प्रयत्न पुरुषार्थ । साधानुया सिद्ध । अगस्त्य सहाय्य । त्याच्या पाठी ।।३।। आपुलाले हित । आपुल्या हातात । अगस्त्य कृपा होत । अनिल म्हणे ।।४।।

(७५)

आमचा आचार आमचा विचार । सर्व मुनीवर एकरूप ।।१।। धन्य माझा भाव ऋषी उपदेश । आम्ही अद्वैत अनुभविला ।।२।। अगस्त्यावीण दुजें नेणे तो सहावें । सद्‌गुरू प्रसादे लाळलेकी ।।३।। सत्कर्म व्रत नित्यकर्म तप । अगस्त्य पंथ मनोभावे ।।४।। देहभाव यज्ञ चित्कर्मरूप । जन्मवृत्ती होई सफल माझी ।।५।। अगस्त्यकृपे स्वीकारी अनिल । अगस्त्य बोध लाभो लोकी ।।६।।



(७६)

चिद्‌रूप म्हणो की शिवरूप रे । चैतन्य त्रिविध एकू अगस्त्यरे ।।१।। अनुभवा ये अनुभवा ये । ब्रह्म मानस पुत्र अगस्त्यु रे ।।२।। तुज सिद्ध म्हणु की योगी रे । योगी मुनी सिद्ध एकु अगस्त्यु रे ।।३।। तुज देव म्हणू की मानव रे । ऋषी रूप तू चैतन्यू रे ।।४।। तुझीया प्रसादे अनिल बोले । देव, सिद्ध, योगी मुनी एकु चिरे ।।५।

(७७)

प्राप्त उचित कर्म सुखाने करीन । आनंदे भरीन प्रपंच हा ।।१।। आश्रमी जाईन सद्‌गुरू भेटी । कृपा दृष्टी त्याची पावने मी ।।२।। संचिताचे फळ ऋषीमुनी कृपा । त्याचिया छायेत वसेन मी ।।३।। सद्‌गुरू अगस्त्य हेचि माझे धाम । अनिल म्हणे क्षेम त्याच्या पायी ।।४।।

(७८)

प्रपंच सुखाचा हवासा वाटतो । नाकारिता धर्म फोल फोल ।।१।। धर्मकर्म नामे दया सेवा श्रम । सर्वाभूती साधावे एक प्रेम ।।२।। सेवा धर्म करिता न हो अहंकारी । अन्यथा पाषाण डोयी फोडी ।।३।। अगस्त्यांची सांगी असावे तत्पर । अनिल म्हणे धर्म आपुलाला ।।४।।

(७९)

जातिकुळ माझें गेलें हारपोनि । देखता मुनी अगस्त्य हा ।।१।। धर्मकर्म माझे झाले एकरूप । सृष्टी सेवा धारी एक मार्ग ।।२।। सावाशी मी साव चोराशी मी चोर । जैशाशी तैसा ऐसा धर्म ।।३।। रात्रंदिन युद्ध अगस्त्य सहाय्ये । साधावे स्वभावे निष्ठा निर्भय ।।४।। सद्गुरू अगस्त्य दाखविला मार्ग । अनिल म्हणे होई सार्थक हे ।।५।।

(८०)

लाभला नरदेह जपा एकभावे । समदृष्टी न्याये वागावे ते ।।१।। गर्व ताठा नको नको माझेपण । सर्वही व्हावे लोकार्पण ।।२।। ब्रह्ममानसाचा हाचि स्वभाव । अगस्त्य असावा एक भाव ।।३।।अनिल म्हणे दिला हाचि धर्म । सद्गुरू अगस्त्य कृपा करी ।।४।।



(८१)

अगस्त्य हा देह । अगस्त्य स्वभाव । वृत्ती अगस्त्य । एकरूप ।।१।। सेवा बुद्धी व्हावे । नियमन योगे । प्रपंची परमार्थ । साधताये ।।२।। ज्ञानवान व्हावे । कर्म आचरावे । अगस्त्य स्वभावे अनिल म्हणे ।।३।।

(८२)

मनाची उभारी । चैतन्य खुमारी । तेणे होय थोरी । जगात या ।।१।। असावे नेमाने । वागावे नेमाने । सर्वांशी नेमाने प्रेमपूर्ण ।।२।। कासयाची चिंता । एकनिष्ठ होता । अगस्त्य हा त्राता । साधकांचा ।।३।। सद्गुरू अगस्त्य । अनुसरा नीट । कर्म एकरूप । अनिल म्हणे ।।४।।

(८३)

जीवनात ऐसा । मिळाला सांगाती । वागवितो हाती । धरूनिया ।।१।। योग याग यज्ञ । नित्य नेम धर्म । सफळ ते कर्म । त्याच्या कृपे ।।२।। एकरूप झालो । त्या अनुसरलो । यशस्वी मी झालो । अनिल म्हणे ।।३।।

(८४)

येथे कोण आहे । माझा बढीवार । सद्गुरू अगस्त्य । त्याची कृपा ।।१।। धर्म कर्म माझे त्याचिया कृपेने । का म्या मग जावे । आडरानी ।।२।। जीवाचे जीवन । सखा ऋषी मुनी । अन्य काय मनी । येई कैसे ।।३।। समबुद्धी झाली । सम दृष्टी झाली । करुणा फळली । अनिल म्हणे ।।४।।

(८५)

काया वाचा मन । असावे श्रीमंत । योग ध्यान तप । सत्यासाठी ।।१।। त्याच्या ठायी सर्व । अनंत अवकाश । जड आणि जीव । त्याची रूपे ।।२।। अहंकार त्याचा । शोधा आत्माराम । देह हाचि धाम । अनंताचे ।।३।। अगस्त्यांनी केले । ज्ञानवान कर्म । सापडले वर्म । अनिल म्हणे ।।४।।

(८६)

अगस्त्य हे कुळ । गुरुकुल अगस्त्य । विद्या ही अगस्त्य। अष्ट अवधानी ।।१।। न्याय नीती धर्म । शस्त्र अस्त्र युद्ध । कर्म नाडी ज्ञान । अगस्त्य हा ।।२।। अगस्त्यांच्या मार्गे । राम पांडवही। कलियुगा ठायी । तोच मार्ग ।।३।। सत्य कर्म धर्म । धर्म सत्य कर्म । जाणुनि हे वर्म । वृत्ती व्हावी ।।४।। एक चित्त ध्यान । अगस्त्यांचे करा । प्रपंची निवारा । अनिल म्हणे ।।५।।



(८७)

ऋषी, मुनी, सिद्ध देव म्हणो काही । जाणते मी एक सद्गुरू आई ।।१।। धरूनी बोटास चाळविले माये । मन काया पुष्ट झाले जीव आनंदी ।।२।। कळीकाळा आम्ही भीत नाही आता । करुणा सागर तुचि विद्या दाता ।।३।। गुंतलो गुंतलो भवाचे पाशी । तुझी कृपा होता आली मोक्ष मिराशी ।।४।। आता दुजे काही राहिले न काम । मन, कर्म निष्काम अनिल झाला ।।५।।

(८८)

दशदिशा वणवा । पेटला धडाडा । भ्रष्टाकार अवघा । धर्म झाला ।।१।। आतंकांचे सैन्य । अनावर झाले । सत्य कोमेजले। प्रलय लोट ।।२।। दंभाचारे सर्व । माजले अपार । मिथ्या व्यवहार। पापियांचा ।।३।। परस्परा खाती । पशूच्या समान । करुणा पराधीन । झाली दिसे ।।४।। जात धर्म भेद । संघर्ष अपार । माणूस गहिवर । शून्य झाला ।।५।। माणूस राक्षस । पशू माणसात। अवघा माणूस । हरपला ।।६।। ठावे कान तुम्हा । सिद्ध योगी राया । तारायाला धावा । अनिल म्हणे ।।७।।

(८९)

ऋषी प्रकटला । तांडव लोटला । रुद्र प्रकटला । अगस्त्य अगस्त्य ।।१।। चराचर सृष्टी । सांभाळण्या साठी । अगस्त्य अवतारी । रुद्ररूपे ।।२।। मन फुरफुरले । बाहू ही स्फुरले । शस्त्रे सरसावले । अगस्त्य योगी ।।३।। आम्ही त्यांचे गण । उठलो पेटून । सत्य जागरण । करण्यासाठी ।।४।। मन बुद्धी ज्ञान । शस्त्रांना प्रमाण । होम प्रज्वलित । करी योगी ।।५।। विश्वरूप झाला । महा प्रकटला । खलत्व सागरा । प्राशियले ।।६।। अवघे दुरित । यज्ञ कुंडी भस्म । बालके सुखरूप । त्याच्या कृपे ।।७।।

(९०)

अगस्त्य सद्‌गुरू । आश्रम माहेरू । लोपामाता प्रेमळू। पान्हावते ।।१।। वाट आश्रमाची । अद्वैत ज्ञान देई । आनंदाची दिवाळी । प्रकाशिते ।।२।। प्रपंच संसारात । भोगे ऐश्वर्य मात । सायुज्य पहाट । भवातूनी ।।३।। मायाबाजार अवघा । भेदे नेई पैलतीरा । लोपा अगस्त्य दातारा । अनिल म्हणे ।।४।।

(९१)

काया पुष्ट झाली अहंकारे । असे हे बांधिले त्रिगुणे ।।१।। ऋषी अहंकार फेडी । आत्माराम दावे हृदी ।।२।। म्हणूनी शरण अगस्त्य मुनी । अनिल म्हणे मिळे मुक्ती ।।३।।

(९२)

श्रमले सारे देव देवी । थकले सारे सप्तर्षी । सर्व रूपे कुंभे जन्म पावे ऋषी । शिवरूपे ।।१।। ब्रह्मांडाचा हो नियंता । होय माझा योगीराणा । त्रिदेवांचा साधे कार्या । एकलाची ।।२।। ऐसे चैतन्य अवतरे । गणेश कार्तिकेया सवे । सप्तर्षित मान मिळे । मांदार्याला ।।३।। त्याच्या कार्ये दीपलेसे । झाले ब्रह्मांड मोकळे । त्रैलोक्य सुखी झाले । अनिल म्हणे ।।४।।

(९३)

लोकी आकांत मांडीला । समाधी सोडा ऋषीवरा ।।१।। दंभ गर्व खल औधत्य । माजले या लोकी नित्य ।।२।। भवभ्रम वरुणालय । करा तुम्ही आचमन ।।३।। यमा करीती आव्हान। अहंकारे ते दानव ।।४।। ऋतुचक्र केले भग्न । साधनांचा बढीवार ।।५।। झाला पापांचा पर्वत । भूमी होई वाटे प्रलय ।।६।। सोडूनिया समाधीस । अनिल म्हणे त्राही सर्व ।।७।।

(९४)

अपयशाचे धनी । का व्हावे आम्ही । असता ऋषी

ज्ञानी । सद्गुरू साचा ।।१।। टाकूनि आळस । हाती धरा शस्त्र । घाव घाला नित्य । दुरिता वरी ।।२।। तूच तुझा ब्रह्म । तूच तुझा विष्णू । तूच तुझा शिव । अगस्त्य ज्ञान ।।३।। अज्ञानाच्या राशी । फेडाव्या सत्वरी । मुनियोगे यशश्री । अनिल म्हणे ।।४।।

## (९५)

नको नको मना । गुंतू मायाजाळी । होऊनिया योगी । प्रकटावे ते ।।१।। अगस्त्य चरित्र । आठवी मनात । होई महाकाय । स्वयंभूपणे ।।२।। तूच तुजा कर्ता । तूच तुझा धर्ता । तूच विघ्नहर्ता । स्वस्वरूप ।।३।। अगस्त्यांची सांगी । आत्मनिष्ठ होई । चैतन्याते भोगी । अनिल म्हणे ।।४।।

## (९५)

ऐसा सद्गुरू । जनांसी आधारू । असीम कृपाळू । सदाशिव ।।१।। मुनिवर सिद्ध । ऋषी यज्ञेश्वर । शस्त्रास्त्र निपुण । महायोद्धा ।।२।। सत्याचा कैवारी । भ्रष्टांचा हा अरी । अहंकार वारी । क्षणात हा ।।३।। जो जाई शरण । पावे कृपा पूर्ण । संकटे दारुण । वाटीतसे ।।४।। ऐकावी ही मात । तारील अगस्त्य । साधावे हे हित । अनिल म्हणे ।।५।।



## (९७)

हाती कुदळी घेऊन । पायी खडावा सारून । जलकमंडलू घेऊन । ऋषी कृषीकर्मा जाई ।।१।। लोपामुद्रा अनुगामिनी । ऋषी सवे मग्न साधनी । करिती श्रम संशोधनी । भूमी वन सेवा ।।२।। वृक्ष वेली रोपे तृण । राखे करूनी संधारण । अगस्त्य योगे सुफलित वन । लोका करी मार्गदर्शन ।।३।। गोसंरक्षण गोपालन । लोपामुद्रेचे राखण । पंचगव्याचे शोधन । कुळमाता नित्य करी ।।४।। भाता पिके रासोराशी । फळे डवरे वृक्षवेली । गायीगुरे पुष्ट होती । लोक अवघे आनंद ।।५।। आश्रम, ग्राम आणि नगरे । नांदती सारे सौख्य भरे । गुरुकुळी ज्ञान वरुषे । सर्व होती सुजाण ।।६।। अनिल म्हणे सद्गुरू ऐसा । सर्व ज्ञानाचा किवळा । राखी विश्व गोतावळा । यज्ञ सत्रे चालवी ।।७।।

## (९८)

स्मरतांचि पावसी । धन धान्य जळ देशी । गुरुकुळे सांभाळिशी । आम्हा सर्वा ।।१।। तू सद्गुरू ईश्वरू । भूलोकाचा आधारू । ऐसा असीम कृपाळू । योगी राणा ।।२।। म्हणून आलोया शरण । द्यावे आम्हां संरक्षण । दुरिते करीती भक्षण। त्राही त्राही ।।३।। आम्ही विसंबलो तूशी । नका अव्हेरू आम्हाशी । हित साध ऐसे करिशी । अनिल म्हणे ।।४।।

## (९९)

साधनांची गर्दी । माणसातू फर्जी । गेली ब्रह्म वृत्ती । तुझी आता ।।१।। विज्ञानाच्या योगे । साधने निर्मिली । तुझ्या तूच कर्णी । गुलाम तू ।।२।। साधनांची माया । तुचि तू निर्माता । मायेचा हा गुंता । का न कळे ।।३।। अगस्त्यांची विद्या । लोपामाता माया । आश्रमीया छाया । तुझ्यासाठी ।।४।। नका होऊ कष्टी । शस्त्र हाती धरी । कृपा अगस्त्यांची । अनिल म्हणे ।।५।।

## (१००)

पालखी चालली । ज्ञानोबा तुकोबा । पालखी शोभला । योगी राणा ।।१।। अगस्त्य पालखी । नामघोष होई । लोपामुद्रा पाही । नवलाई ।।२।। विणा मृदुंग टाळ । नामाचा गजर । ठायी ठायी स्वागत । औक्षणे ।।३।। अगस्त्यांचा अश्व । नाचत जाईल । चंद्रभागे शोभेल । वाळवंटी ।।४।। मुनिचा सद्गुरू । देवा शिरी धरू । भेटीला विठ्ठलू । अनिल म्हणे ।।५।।

## (१०१)

अगस्त्य आश्रम । विद्येचे माहेर । ज्ञान कला निपुण । होती सर्व ।।१।। सामर्थ्य संपन्न । शस्त्रास्त्रे संपन्न । नाडी ज्ञान



पूर्ण । स्वये होती ।।२।। लोपामुद्रा माता । संस्कृति संपन्ना । सर्वाभूती प्रेमा । कर्मयोगी ।।३।। जावूनी आश्रमी । सिद्धी प्राप्त करी । यशस्वी संसारी । अनिल म्हणे ।।४।।

## (१०२)

हेचि दान द्या अगस्त्या । साधू पुरुषार्थ हा साचा ।।१।। आम्ही बंदिस्त प्रपंची । गर्भ पोटी उठाउठी ।।२।। धन दारा घर दार । ऐसा गावकी व्यवहार ।।३।। सोशी दुःख नित्य अपार । मनी सुखाची जी आस ।।४।। भोगी अस्मानी सुलतानी । क्रूर स्वार्थाच्या बाजारी ।।५।। तूचि तूच आम्हा त्राता । अनिल म्हणे राखा आता ।।६।।

## (१०३)

### आरती (अभंग)

आरती मुनीवरा । महा सिद्ध योगी राजा । सेवीतो हे चरण । कृपा व्हावी ऋषीवरा ।।धृ।। अस्थिर विश्व होता । त्वा राखिले सर्वथा । स्थापूनि ऋतु चक्रा । त्वा फुलविली भू माता ।।१।। काळकेशी शूरपद्म । दंडी वातापि इल्वल । सिद्ध शक्ती एकवटून । आचमनी सागरा ।।२।। शक्ती मातृका मेळवून । केला लोपामुद्रा जन्म । सांभाळीला गोत्रज । बालकांना देई

अभय ।।३।। व्यवहार, युद्ध अध्यात्म । ज्ञान प्रेरिले नित्य । लोकी साधे पुरुषार्थ । अनिल वंदी अगस्त्य ।।४।।

(१०४)

प्रसन्नले मन । उभा पांडुरंग । तुटे भवपाश । वाटे मज ।।१।। अहंभाव सारा । झाला परागंधा । जाहलो निवांत । एक भाव ।।२।। नातीगोती सारी । झाली विश्वरूप । एकवटती जीव । एके ठायी ।।३।। जग पांडुरंग । काया पांडुरंग । मन पांडुरंग । अनिलाचे ।।४।।

(१०५)

लौकीकि व्यवहार । सोंग ढोंग सारे । मनाची मोहर । भिन्न असे ।।१।। गारूड्याचा खेळ । कसरती मेळ । दंभ गर्व स्पर्धा । ठायी ठायी ।।२।। बोलणे वेगळे । वागणे वेगळे । मनात वेगळे । कळो नये ।।३।। देवाचिया द्वारी । काय राहे गुप्त । तोडा देहभाव । अनिल म्हणे ।।४।।

(१०६)

सुखाचे गाठोडे । शोधू जाता कुठे । क्षणभर सारे । मोह मयी ।।२।। तंडतो भांडतो । वादावादी करी । सारखा संघर्ष सर्व ठायी ।।२।। प्राप्त प्रपंचाचा । नेटका आधार । ठेवा



भक्तिभाव । श्रद्धा पूर्ण ।।३।। व्यर्थ पहा स्वार्थ । साधा परमार्थ । धरा संतसंग । अनिल म्हणे ।।४।।

(१०७)

मीच मोठा ज्ञानी । मीच सद्‌गुणी । मीच हो अग्रणी । जनांचाया ।।१।। माझ्राची आधार । लोकांत धुरीण । माझ्यामुळे पान । हाले डुले ।।२।। अंगी भरे ताठा । लोकी दावे तोरा । काळ येता द्वारी । व्यर्थ सारे ।।३।। भ्रमात भ्रमिष्ट । फिरे सैरभैर । अनिल म्हणे व्यर्थ । सांडा सांड ।।४।।

(१०८)

देह वासनेचा । विकृती व्यापला । पछाडिले मना । सर्व भावे ।।१।। पाहता अमिश । जाहला व्याकूळ । प्राणाचा विसर । पडू जाये ।।२।। नको नको मना । गुंतू माया जाळी । काळ ये जवळी । ग्रासावया ।।३।। नामा एका तुका । आरडूनी सांगे । ध्यानी न ये रे । अनिल म्हणे ।।४।।

(१०९)

राम कृष्ण हरि । मुरारी मुकुंद । गोविंद विठ्ठल । पांडुरंग ।।१।। ध्यानि निशीदिनी । आठवावे भावे । मुखे उचारावे । पांडुरंग ।।२।।

पुरुषार्थि रत । कर्तव्या तत्पर । सांभाळित घर । पांडुरंग ।।३।। अनिल उच्चारी । असता प्रपंची । नाचतो दंगुनी । पांडुरंग ।।४।।

(११०)

ब्राह्मण ब्राह्मण । जन्माला का आलो । अपराधी झालो जना ठायी ।।१।। ब्राह्मण ठोकावा । ब्राह्मण चिरडावा । अतिदुशवावा । पुरोगामी ।।२। वर्जिता ब्राह्मण । सत्ता हाती येते । राजपाट भोक्ते । पुरोगामी ।।३।। बुडवा ब्राह्मण । समुद्री लोटवा । जागवितो आम्हा । अनिल म्हणे ।।४।।

(१११)

संस्कृतीच्या बेड्या । परंपरेपायी । पापाचे ते धनी । ब्राह्मणचि ।।१।। म्हणो ब्राह्मणांनी । विटाळले विश्व । त्यांचे करा भक्ष । भोगा सत्ता ।।२।। सोवळे कर्मठ । कर्म कांड यांचे । बांधिली माणसे । झोडा त्यांसी ।।३।। अनिल विचारी । हो जर उद्धार । टाकावे वाळीत । ब्राह्मणाला ।।४।।

(११२)

नव्हतो कधीच । आमुचेच बाप । जाहलो ब्राह्मण दोष कोणा ।।१।। संस्कृती सारणी । धर्म सदाचार । झालो



पुरोहित । सत्तेचेया ।।२।। सत्तांध भोगिती । शोषूनिया सत्ता । ब्राह्मण लाचार । त्यांचे भाट ।।३।। चोरांच्या उलट्या । बोंबा ऐकूनिया । सोळ्यात अडकले । अनिल म्हणे ।।४।।

(११३)

भातुकलीचा खेळ । त्याने मांडियेला । प्रपंच पसारा । तुम्हा आम्हा ।।१।। त्याला भेटण्यासी । खेळगडी व्हावे । खेळावे निष्ठेने । जीवे भावे ।।२। सत्य भातुकली । व्यवहार प्रपंच । तोच त्याचा खेळ । खेळो जाणे ।।३।। साधा पुरुषार्थ । मानवी जीवनी । ठेवावी प्रवृत्ती । निज धर्म ।।

(११४)

नाम नाती जात । मनाचा हा खेळ । घालावा हो मेळ । एका ठायी ।।१।। व्यवहार व्याप । न माना असत्य । त्याने दिला पट । तुम्हा हाती ।।२।। खेळताना खोटे । वाटतसे सोपे । गळफास दावे । ज्याचे त्याला ।।३।। या सत्याचा बाप। पल्याड बसला । हसे तुझ्या खेळा । अनिल म्हणे ।।४।।

(११५)

देवा तुझे हे गारुड । अनंत ब्रह्मांडांचे वारुळ ।।१।।

ब्रह्मांडाचा तू बाप । माणूस तुझ्या परिस महान ।।२।। अहंकाराचा मी पुतळा । तुला तुडवी पायतळा ।।३।। अंतरीचे गुज देवा । तुला त्याचा अंत ठावा ।।४।। तूच मांडियेले खेळा । अनिल म्हणे राखी त्याला ।।५।।

(११६)

वासनेचा पुतळा । विकृतींचा कोहळा । नानापरी मिरविता । मीच माझा ।।१।। कोल्ह्यापरी लुबाडणे । कुत्र्याचे चघळणे । बक ध्यान लावणे । सोयीने ते ।।२।। न्यायाचा मी ठेकेदार । मला नीतीचा गहिवर । कळवळ्याचा दावी भार । गावाचा मी ।।३।। लांडग्याची जात माझी । मिरवितो गायी परी । पाखांडाचा मी पुजारी । अनिल म्हणे ।।४।।

(११७)

नको नको मना । जाऊ काया संगे । भूती बढीवार । वासनेचा ।।१।। वासनेचा देह । दंभाचे आगर । सैराट सागर । उफाणला ।।२।। चोरांचिया संगे । ठरशी तू चोर । कासयाशी घोर । भवाचा हा ।।३।। अनिल म्हणे राही । आत्मभावा संगे । येर झार भंगे । जीवन्मुक्त ।।४।।



(११८)

घेतले हे व्रत । मी न अंधतेने । अभ्यास चिंतन । ध्यास माझा ।।१।। जायचे पलिकडे । ठावे होते कोणा । सद्गुरू नेतो । कैवल्याशी ।।२।। माझे चित्त रंगे । पांडुरंगा संगे । अनिलाचे गाणे । मनोमनी ।।३।।

(११९)

शिव सद्गुरू । विष्णू सद्गुरू । ब्रह्म सद्गुरू । दत्तरूप ।। पिता सद्गुरू । माता सद्गुरू । मित्र सद्गुरू । निस्वार्थक ।। भूते सद्गुरू । सृष्टी सद्गुरू । गात्रे सद्गुरू । ज्ञानार्जनी ।। भाषा सद्गुरू । अर्थ सद्गुरू । न्याय सद्गुरू । समाजाशी ।। दिशा सद्गुरू । मागे सद्गुरू । पुढे सद्गुरू । सर्व रूपे ।। चैतन्याचे साक्षी । धोंडा सद्गुरू । मन सद्गुरू । अनिल म्हणे ।।

(१२०)

ऐकतो पाहतो रेडिओ नि टीव्ही । अनाचार, भ्रष्टाचार, दंभाचार ।।१।। जाणपण तरी आहे पराधिन । लॅबटॅब, मोबाईल, स्मार्टपण ।।२।। बस, कार, ट्रेन, प्लेन । झाले सारे फास्ट मनवाही ।।३।। बोलणे, बसणे, झोपणे, संपले । अवघेची मानव्य वादळीते ।।४।। अनिल म्हणे आता माणूसच रोबो ।

देवाला गवसणी तोचि देखो ।।५।।

(१२१)

शेकडोनी मजले रान बिल्डींगींचे । उकिरडे झोपडपट्ट्यांचे शेजारी ।।१।। समतेच्या गप्पा गेल्या वाऱ्यावरी । गुंड शोषक मदमस्त मात्र स्वारीवरी ।।२।। आर्थिक न्याय, सामाजिक न्याय। अवंढे, उसासे, आरडा माय माय ।।३।। अनिल म्हणे दृष्टी सम गेली लयी । नामा, ज्ञाना, चोखा, एका, तुकोबाची ।।४।।

(१२२)

जन्मा आलो चुकी झाली । नव्हते माझ्या हाती काही ।।१।। चुकतची गेलो जन्मभरी । काय करावे एवढेच हाती ।।२।। क्षमा मागी भाक मागी । तिष्ठतो मी देवा द्वारी ।।३।। यशअपयश माझ्या ठायी । उभा राही एका ठायी ।।४।। चूक माझी चूक त्याची । कीर्ति अपकीर्ति त्याची ।५।। अनिल म्हणे ताप सोडी । त्याची खेळी द्वैतभावी ।।६।।

(१२३)

एकटा ना मी कधी होतो । जन्मजन्मान्तरी मी तो ।१।। लक्ष चौऱ्यांशीचा जीव खेळ । एक त्याचा स्वप्न खेळ ।।२।।ॉ



पंचभूतांचा मेळ खेळ । अवघा भातुकली खेळ ।।३।। म्हणू कसा खरा खोटा । तोचि ठरे खरा खोटा ।।४।। अनिल म्हणे मीची खरा । माया रूपे तोचि खोटा ।।५।।

(१२४)

व्यासोच्छिष्ट जगत्रय । सांगी ज्ञाना सांगे जरी ।।१।। तरी चघळतो आम्ही । भारताची जात वारी ।।२।। जातीच्याच गर्ते मधी । गुढगुंता कोळी जाळी ।।३।। पांडुरंगे कैशा जाती । अनिल म्हणे काकुळती ।।४।।

(१२५)

स्वीकारीली सत्ता । अशी लोकशाही । संप मोर्चे धर्णे । सदोदित ।।१।। हरताळ बंद । मागण्या आश्वासनं । एकविध सारे । देखावा हा ।।२।। वोज नाही पाणी । अन्नधान्य पळे । कोरडा नि ओला । एका मागे ।।३।। शासनाचे झाले । मयसभे ऐसे । संमेलन ऐसे । फसव्यांचे ।।४।। दैवाधीन जन्ता । दैवाधीन वत्ता । दैवाधीन रक्षा । सर्वथाही ।।५।। येथे दोषी कोणी । मानीनाच न्याय । अवघेची पाहे । पांडुरंग ।।६।। कोणाशी पाडावे । कोणाशी भांडावे । विवेकी जाणावे । अनिल म्हणे ।।७।।

(१२६)

जे जे मनी होते योजिलेले काही । ते ते सारे योजूनी होऊ दिले नाही ।।१।। मनमानी तुझी सनातनाचीच आहे । वेड्यापरी मीही लढतोची आहे ।।२।। सांगूनिया गेले ऋषी मुनी योगी । तूच तुझा स्वामी अहंब्रह्मास्मी ।।३।। करिता प्रपंच निष्ठाऊनी सत्य । दाविसी करूनी निष्ठाऊनी असत्य ।।४।। वागता माझे मी सत्य बुद्धीवादी । अनिल म्हणे ठरविती मला अंधवादी ।।५।।

(१२७)

ज्ञाना नामा चोखा । सावता एका तुका ।।१।। सोयरा जना मुक्ता । निर्मळा बहीणा ।।२।। नरहरी गोरा । कबीराचा शेका ।।३। अवघे झाले विष्णू । अनिल म्हणे ।।४।।

(१२८)

संतांचिया नादे । विष्णूरूप जग । भेदाभेद सर्व । विरामले ।।१।। जातिकूळ धर्म । मार्ग वंश कर्म । विष्णू एक वर्म । रंगले अवघे ।।२।। गेला मावळूनी । सूर्य आणि चंद्र । ओंकार स्वरूपी । परब्रह्म ते ।।३।। स्वर ताल लय । अभंगी रंगले । अनिल म्हणे झाले । पांडुरंग ।।४।।



(१२९)

ज्ञानदेव विष्णू । तुका झाला विष्णू । नामा एका विष्णू । भू वैकुंठी ।।१।। मुक्ताईची मुंगी । आकाशी उडाली । ब्रह्म रूप दावी । भू वैकुंठी ।।२।। जनाईचे जाते । फिरे गरा गरा ब्रह्मांडीचा नाद । भू वैकुंठी ।।३।। लाखा चोखा बंका । सोयरा निर्मळा । गोपाळांचा काळा । भू वैकुंठी ।।४।। निळोबाची बहीणी । झाले समरस । कैवल्य पताका । भू वैकुंठी ।।५।। पांडुरंग ध्यानी । विठ्ठल भजनी । साक्ष विष्णू अनिला । भू वैकुंठी ।।६।।

(१३०)

करावे ते कर्म साधून कर्तव्य । आपसुक पुरुषार्थ साधवा तो ।।१।। तोच खरा धर्म सर्वाभूती प्रेम । हृदयी माणूसपण सांभाळी तो ।।२।। जात पंथ धर्म प्रपंच व्यहार । उपचार कर्म तोचि खेळवितो ।।३।। त्याचे नाम रूप त्याचा सदा ध्यास । अनिल म्हणे नाव तोचि पार नेतो ।।४।।

(१३१)

आठा वरुषांचे । गोप कृष्णरूप । डोयी दिला ठाव । शिवलिंग ।।१।। ओठंगून असे । वळिता गोधन । भक्तिरूपे झाला । पांडुरंग ।।२।। पांडुरंग ध्यानी । पांडुरंग मनी । राधे

रुकुमाई पांडुरंग ।।३।। सरस्वती तीरी । श्रीपुराचे ठायी । राधालक्ष्मी पाही । पांडुरंग ।।४।। गालवमुनी शिष्य । पांडुरंग मुनी । राधालक्ष्मीकृष्ण । पांडुरंग ।।५।। सरस्वती चंद्रभागा । झाले योग पीठ । अनिला होची भेट । पांडुरंग ।।६।।

(१३२)

आयटीच्या सामर्थ्ये । स्मार्ट मिरविला जगे । तंत्रज्ञानी मन हरपले । अनिल म्हणे ।।१।। स्मार्ट झाले सारे । गर्दीच्या साधने । ओळखेना कोणे अनिल म्हणे ।।२।।

(१३३)

कशाचा प्रारंभ । कशाचा शेवट । मार्ग धरा थेट । अनंताचा ।।१।। जाता जाता मार्गी । करावा विचार । योग क्षेम नाही । पांडुरंग ।।२।। उगा नको भीड । उगा नको मोह । मनी धरी गाठ । पांडुरंग ।।३।। गुरू माता पिता । सोयरा धायरा । कांता मित्र पुत्र । पांडुरंग ।।४।। साधनांच्या सुखे । जातो फोल वाहे । विसरूनी भ्रमे । पांडुरंग ।।५।। जाता योग पीठे । पांडुरंग भेटे । माया मोह फीटे । अनिल म्हणे ।।६।।

●●●